# विश्वास को-ऑप. बँक लि; नाशिक

प्रशासकीय कार्यालय : विश्वविश्वास पार्क, स्वातंत्र्यवीर सावरकरनगर, गंगापूर रोड,
नाशिक-४२२०१३. टेलीफॅक्स:(०२५३)२३०५६००-०३

## ऋणको सभासद थकबाकीदार मे.सेजल फिड्स यांचे

## स्थावर मिळकत जाहिर लिलावाने विक्रीचा जाहीरनामा

तमाम लोकांना कळविण्यात येते की, ऋणको **मे.सेजल फिड्स प्रोप्रा.सौ. अश्विनी राजेंद्र दळवी व श्री. राजेंद्र केदा दळवी (सहकर्जदार व संमतीदार)**, अनुनाम निवास, निंबोळा रोड, बिडी भालेकर कॉलेज समोर, लखमापूर, ता.सटाणा, जि. नाशिक-४२३२१३., **जामिनदार-१) श्री.विजय ओंकार पाटील**, रा. श्रीकृष्ण कॉलनी, सटाणा नाका, ता.मालेगांव, जि.नाशिक-४२३ २०३. **जामिनदार-२) श्री.सुनिल केदा दळवी** रा.अनुनाम निवास, निंबोळा रोड, बिडी भालेकर कॉलेज समोर, लखमापूर, ता.सटाणा, जि. नाशिक-४२३२१३ यांनी विश्वास को-ऑप.बँक लि.,नाशिककडून कॅश क्रेडीट कर्ज रु.२,००,००,०००/-, घेतलेले आहे.

सदरच्या कर्जाची नियमीत मुदतीत परतफेड न केल्याने ऋणको यांचे विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १०१ अन्वये क्र.६९/२०२४ दि.१३/०९/२०२४ रु.२,२०,३०,८२२/- + व्याज + सरचार्ज = एकुण रक्कमेचा वसुली दाखला बँकेने मिळविला आहे व रजिस्टर्ड पोस्टाने मागणी नोटीस बजावणी केलेली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६ व १९६१ चे नियम १०७ चे (१० व ११) अन्वये स्थावर मिळकतीची जप्ती दि. ३/५/२०२५ रोजी व पेपर प्रसिद्ध दि.४/०५/२०२५ रोजीच्या दै. पुण्यनगरी वर्तमान पत्रात केलेली आहे. तसेच नियम १०७ (११(ड-१)) अन्वये स्थावर मिळकतीचा प्रतिकात्मक प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६ व १९६१ चे नियम १०७ (३ ते २०) अन्वये मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश जा.क्र.ना.बँका/सआ-१/विश्वास को-ऑप. बँक/क.१५६/अधि./२६/५१८, दि.२५/०३/२०२६ अन्वये स्थावर, जंगम मिळकती जप्ती व जाहीर लिलावाने विक्रीचे अधिकार प्राप्त आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६ व १९६१ चे नियम १०७(११) (ई) (४) अन्वये म.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचे आदेश जा.क्र. २५५८/बँक/विश्वास बँक/अ.प्रा. निश्चिती क्र.९२-२५/२०२५, दि. २७/०३/२०२६ अन्वये अपसेट प्राईज निश्चिती व जाहीर लिलावाने विक्रीची परवानगी प्राप्त आहे.

दि. ०५/०५/२०२६ रोजी स्थावर मिळकत लिलाव पुर्व नोटीस व अपसेट प्राईज मंजुरी ऋणको यांना बजावणी केली आहे. यानंतरही ऋणको यांनी वसुलपात्र रक्कमेचा भरणा केलेला नाही. सबब खालील परिशिष्ठातील नमुद मिळकती जाहिर लिलावाने विक्री करून थकित येणेबाकी रक्कमेचा भरणा केला जाईल.

### -: परिशिष्ठ :-

**तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका बागलाण पैकी नाशिक जिल्हा परिषद हद्दीतील मौजे लखमापुर या गांवचे शिवारातील गट नं. ४८१/१/१ यांसी क्षेत्र १३९७२.०० चौ.मी. व त्यावर बांधलेले घर यांसी चतु:सिमा गांव नकाशाप्रमाणे.**

**लिलाव अपसेट प्राईज रु.३,८४,२३,०००/- (अक्षरी रुपये तीन कोटी चौऱ्याऐंशी लाख तेवीस हजार मात्र)**

**ह्या वरील परिशिष्ठातील मिळकतींचा लिलाव अपसेट प्राईजनुसार सोमवार, दि. २९/०६/२०२६ दु.१.०० वा. स्थावर मिळकतीच्या ठिकाणी अनुनाम निवास, निंबोळा रोड, बिडी भालेकर कॉलेज समोर, लखमापूर, ता.सटाणा, जि. नाशिक-४२३२१३ येथे होणार आहे.**

लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी रु. ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र) अनामत रक्कम बँकेच्या कोणत्याही शाखेत दि.२५/०६/२०२६ पावेतो (कॅश/डीडी/चेक/पे-ऑर्डर) ने भरणा करुन लिलावात भाग घ्यावा. तसेच या लिलावामध्ये अपसेट प्राईजच्या पुढे रु.१,००,०००/- च्या पटीने लिलाव बोलीत वाढ होईल.

स्थावर मिळकतीचा लिलाव ''जसे आहे तसे'' तसेच ''जेथे आहे तेथे'' या तत्वावर होईल.लिलावाच्या अटी व शर्ती बँकेच्या केंद्र कार्यालय नोटीस बोर्डावर जाहीर करण्यात आल्या असून लिलावाच्या वेळी वाचून दाखविण्यात येतील. तसेच स्थावर मिळकतीची पाहणी सोमवार, दि. ०१/०६/२०२६ ते दि. १५/०६/२०२६ पर्यंत कामकाजाचे दिवशी स.१० ते सा. ५ या वेळेत करता येईल. तसेच सदरची नोटीस बँकेची अधिकृत https://vishwas.bank.in/ या संकेतस्थळावरही पाहण्यात यावी.

हा आदेश माझे सही शिक्क्यानिशी जारी करण्यांत येत आहे.

(सौ. सारिका समीर देशपांडे)
वसुली अधिकारी-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०
चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये
मोबाईल क्र.८३८०० १६५०४

स्थळ : नाशिक
दिनांक : २५/०५/२०२६

शिक्का